# Haffkine Bio-Pharmaceuticals Corporation (Ltd.)
## (Materials Department)

**Acharya Donde Marg, Parel, Mumbai 400 012.**

**Tel.No. +91-22-24147564**

**Website: https://www.vaccinehaffkine.com**

**E-mail: mm@vaccinehaffkine.com**

## Tender Website: https://mahatenders.gov.in

हाफकिन महामंडळ, परेल, मुंबई विभाग येथील कर्मचारी यांचेसाठी उपहारगृह चालविण्यासाठी इ—निविदा

**Tender No.HBPCL/M-10/Canteen-Mumbai/2025-26**

# <u>Haffkine Bio-Pharmaceutical Corporation Ltd.</u>

<u>(A Government of Maharashtra Undertaking)</u>

**<u>(MM Dept.)</u>**

## Tender Notice

**Tender reference No: HBPCL/M-10/Canteen-Mumbai/2025-26**

Managing Director, Haffkine Bio-Pharmaceutical Corporation Ltd., Parel, Mumbai invites online TENDER for the years **2025-26** in two envelope system from the genuine contractor/suppler for providing staff canteen service for HBPCL, Parel, Mumbai unit.

| Sr. No. | Name of Service | Quantity | Name of Dept | Tender Fee (Rs.) | EMD (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Staff Canteen Service for Parel, Mumbai unit | Provding Tea, Snacks and Lunch for approx 300 staffs | HBPCL Parel, Mumbai | Rs.3,900/- | Rs.65,000/- (No fee for MSME holder) |

Interested eligible tenderers may obtain further information of technical specifications, and other terms and conditions applicable for procurement of above services from the tendering websit https://mahatenders.gov.in

**TENDER SCHEDULE**

All bid related activities (Process) like Tender Document Download, bid submission and submission of EMD and other documents will be governed by the time schedule given under Key Dates below:

| Sr. No | Activity | Period |
|---|---|---|
| 1 | Period of sale of Tender document/Download | From Dt.07.10.2025, 15.30 Hrs. |
| 2 | Dates for uploading tender document | From Dt.07.10.2025, 15.30 Hrs. to Dt.18.10.2025 upto 15.30 Hrs. |
| 3 | Date and time of Pre-bid meeting | Dt.13.10.2025 @ 14.00 Hrs. |
| 4 | Last date and time for submission of tender: | Dt.18.10.2025 upto 15.30 Hrs. |
| 5 | Date and time of opening of Envelope No.1 (Technical Bid) | Dt.20.10.2025 @ 11.00 Hrs. |

Address for communication : Office of the Materials Manager,
Haffkine Bio-Pharmaceutical Corporation Ltd.,
Acharya Donde Marg,
Parel, Mumbai 400012

HBPCL

# हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित)

परळ, मुंबई — ४०० ०१२

उपहारगृह चालविण्यासाठी ठेकेदाराकडून निविदा,

(अटी व शर्ती)

१. हाफकिन जीव—औषध निर्माण महामंडळ, आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई — ४०००१२ येथील उपहारगृहामध्ये २०२५—२६ अश्या १ वर्ष कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने चालविण्यासाठी अनुभवी आहार व्यवस्था करणाऱ्या खाजगी ठेकेदाराकडून/ भागीदारामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यवसायधारकांकडून/खाजगी व्यवसायधारक कंपनीकडून/ उपहारगृह चालकांकडून खाद्य व पेय पदार्थ पुरविण्यासाठी निविदा खालील अटींचे अधीन राहून मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा **दिनांक ०७.१०.२०२५ दुपारी ०३.०० वाजल्यापासुन ते दिनांक १८.१०.२०२५ पर्यंत रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन उपलब्ध होतील.** निविदा अर्जाची किंमत रु. ३,९००/— असून ना—परतावा असेल. बयाना रक्कम रू.६५,०००/— असुन MSME प्रमाणपत्रधारकांना सदर रक्कम भरणा न करण्यासाठीची सवलत आहे.

**इ—निविदा भरण्यास इच्छुक असणा—या ठेकेदारांसाठी इ—निविदेबाबत माहिती देण्यासाठी व त्यांच्या काही शंका असल्यास त्याच्या निरसनासाठी सोमवार दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता सभा (Pre-Bid Meeting) ठेवण्यात आली असुन सदर सभेस आपण सामुग्री विभाग, हाफकिन जीव—औषध निर्माण महामंडळ, आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई —१२ येथे उपस्थित रहावे.**

२. ठेकेदारास सूची '१' आणि सूची '२' मध्ये नमूद केलेले पदार्थ व पेये महामंडळातील अंदाजित एकूण ३०० कर्मचाऱ्यांना पुरवावे लागतील.

३. निविदा भरणारे खाजगी ठेकेदाराकडून/ भागीदारामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यवसायधारकांकडून/खाजगी व्यवसायधारक कंपनीकडून/ उपहारगृह चालक यांनी त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक दयावा, भागीदारांनी त्यांची यादी तसेच इतर भागीदारांचे Power of Attorney जोडावे. त्याचप्रमाणे वास्तव्याचा/ पत्रव्यवहाराच्या पृष्टयर्थ अधिकृत पुरावा म्हणजे शिधावाटप पत्रिका/ पासपोर्ट/ वाहन परवाना/ मतदार ओळखपत्र/ आधारकार्ड यापैकी एक पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

४. दररोज सकाळी ८.०० ते १०.३० या वेळेत चहा व नाश्ता आणि दुपारी ३.०० ते ७.०० या वेळेत चहा व नाश्ता उपहारगृहामध्ये तसेच वेगवेगळया विभागांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पुरवावा लागेल. ते विभाग पुढीलप्रमाणे—व्यवस्थापकीय संचालक कार्यालय, महाव्यवस्थापक कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, लेखा विभाग, लेखा परिक्षा विभाग, लेखा परिव्यय विभाग, सामुग्री विभाग, संगणक विभाग, पणन विभाग, इनव्हाईस विभाग, दवाखाना विभाग, हाफकिन अजिंठा विभाग, कामगार कल्याण विभाग, गुणवत्ता अश्वासन विभाग, गुणनियंत्रण विभाग (रसा.), गुणनियंत्रण (जीव), यंत्रपरिरक्षण विभाग, जावक विभाग, मौखिक द्रव विभाग इत्यादी. या सर्व विभागांमधील कर्मचारी यांना संबंधित विभागामध्ये सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत दुपारचे जेवण उपहारगृहामध्ये पुरवावे लागेल. त्यासाठी ठेकेदारांना पुरेसा नोकर वर्ग ठेवावा लागेल व पुरेश्या प्रमाणात खाद्य पदार्थ उपलब्ध ठेवावे लागतील.

५. उपहारगृहामध्ये जेवणाचे रजिस्टर ठेवण्यात येईल. या रजिस्टरमध्ये दुपारी जेवण सुविधा घेणेपूर्वी प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वत:च्या हस्ताक्षराने स्वत:चे नाव, तिकीट क्रमांक, आणि स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. महिन्याच्या अखेरीस जेवणाच्या रजिस्टरमध्ये नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांचे संख्येनुसार उपहारगृह कंत्राटदारास महामंडळाकडून अनुदान देण्यात येईल. जर एखादया कर्मचाऱ्याने रजिस्टरमध्ये स्वत:च्या नावाची नोंद केली नाही तर कंत्राटदारास महामंडळाकडून त्या कर्मचाऱ्याचे अनुदान देण्यात येणार नाही. /**अथवा** कर्मचा—यांना चहा, नाश्ता, जेवण यासाठी महामंडळाकडून कुपन देण्यात येईल. सदर कुपनच्या बदल्यात कंत्राटदारामार्फत कर्मचा—यास चहा, नाश्ता, जेवण सुविधा देण्यात येईल.

HBPCL

६. परळ विभाग येथे सकाळी दोन प्रकारचा नाश्ता तयार करण्यात येईल. महामंडळातील स्थायी स्वरूपातील कर्मचारी, अप्रेंटीस, ट्रेनी यांना सकाळी जास्तीत जास्त २ प्लेट नाश्ता प्रति कर्मचारी अनुदानित दराने देण्यात येईल. तसेच सायंकाळी जास्तीत जास्त १ प्लेट नाश्ता प्रति कर्मचारी अनुदानित दराने देण्यात येईल. तसेच पूर्ण दिवसातून जास्तीत जास्त ३ वेळा चहा अनुदानित दराने देण्यात येईल. वरील क्र.४ मधील नमूद विभागांमध्ये आणि उपहारगृहामध्ये रजिस्टर ठेवण्यात येईल. दररोज प्रत्येक कर्मचारी नाश्ता व चहा घेणेपूर्वी स्वहस्ताक्षराने स्वत:चे नाव, तिकीट क्रमांक, स्वाक्षरी आणि किती प्लेट नाश्ता घेतला याची संख्या या रजिस्टरमध्य नमूद करेल. महिन्याच्या अखेरीस चहा आणि नाश्ता रजिस्टरमध्ये नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या आणि किती प्लेट नाश्ता आणि चहा घेतला त्यानुसार उपहारगृह कंत्राटदारास महामंडळाकडून मासिक अनुदान देण्यात येईल. जर एखादया कर्मचाऱ्याने रजिस्टरमध्ये स्वत:च्या नावाची नोंद केली नाही तर कंत्राटदारास महामंडळाकडून त्या कर्मचाऱ्याचे अनुदान देण्यात येणार नाही./**अथवा** कर्मचा—यांना चहा, नाश्ता, जेवण यासाठी महामंडळाकडून कुपन देण्यात येईल. दैनंदिन कुपनच्या संख्येनुसार उपहारगृह कंत्राटदारास महामंडळाकडून मासिक अनुदान देण्यात येईल.

७. दुसऱ्या पाळीत कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी संध्याकाळी ६.०० ते ७.०० या वेळेत उपहारगृहात खाद्यपदार्थ पुरविण्यात यावेत. दुसऱ्या पाळीमध्ये कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यास सायंकाळी जास्तीत जास्त २ प्लेट नाश्ता आणि चहा अनुदानित दराने देण्यात येईल.

८. उपहारगृहातील पदार्थाची विक्री रोख पैसे घेऊन करावयाची आहे. कर्मचाऱ्यांकडून पैसे वसूल करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराचीच राहील

९. महामंडळाचे कामकाज तिन्ही पाळ्यांमध्ये चालते. त्यामुळे तिन्ही पाळ्यांमध्ये उपहारगृहाची सेवा उपलब्ध असली पाहिजे. तसेच शनिवार/रविवार या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी व अन्य सुट्टी असलेल्या दिवशी काही खात्यांमध्ये व उत्पादन विभागामध्ये कर्मचारी अत्यावश्यक कामासाठी येतात अशा वेळी त्यांनाही उपहारगृहातून खाद्य पदार्थ व चहा/कॉफी पुरविण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील. अशा वेळी खाद्य पदार्थ मिळाले नाहीत अशी तक्रार येता कामा नये.

१०. उपहारगृहाचे व्यवस्थापण व समस्या सोडविणेकरिता उपहारगृह कंत्राटदार स्वत: अथवा त्याने नेमणूक केलेला मॅनेजर दररोज पूर्णदिवस उपहारगृहामध्ये उपस्थित राहील. ठेकेदाराने उपहारगृहामध्ये काम करण्याऱ्या सेवक वर्गाची यादी महामंडळास सादर करावी लागेल. महामंडळास सादर केलेल्या यादीतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणताही व्यक्ती/सेवक उपहारगृहामध्ये आढळून येणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. उपहारगृहामध्ये सेवक वर्ग नियुक्त केल्यावर संबंधीत सर्व सेवक हे सशक्त आहेत व त्यांना कोणताही संसर्गजन्य रोग झालेला नाही याचा वैद्यकिय दाखला ठेकेदाराने महामंडळास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच ठेकेदाराने स्वत:चा कुक व इतर नोकरवर्ग कार्यरत ठेवावा.

११. उपहारगृहातील पदार्थ बनविण्यासाठी व ते कर्मचाऱ्यांना वाढण्यासाठी ठेकेदाराला स्वत:चा नोकरवर्ग नेमावा लागेल. ठेकेदारास त्यांची स्वच्छता व त्यांची सेवा याकडे लक्ष द्यावे लागेल. नोकर वर्गास कोणताही संसर्गजन्य रोग नसावा. ठेकेदाराने नेमलेल्या नोकरवर्गाचा पगार ठेकेदारास द्यावा लागेल. तसेच कामगार राज्य विमा योजना, भविष्य निर्वाह निधी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,या व इतर कामगार कायद्याचे पालन करावे लागेल व त्यासाठीचे अंशदान करावे लागेल. तसेच त्या त्या कायद्याखालील वेगवेगळे रिटर्नस वेळेत पाठविण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१२. शासन किंवा महानगरपालिकेने उपहारगृह चालविण्यासंबंधी केलेल्या नियमांचे ठेकेदाराने पालन केले पाहिजे. तसेच कामगार विषयक कायद्याचे पालन केले पाहिजे. ठेकेदाराने बालकामगारांना नोकरवर्ग म्हणून कामावर ठेवता कामा नये. बाल कामगार कामावर राहणार नाही याची जबाबदारी उपहारगृह कंत्राटदाराची असेल.

१३. ठेकेदाराने उपहागृहात तसेच स्वयंपाकगृहात उत्तम दर्जाची स्वच्छता, शिष्टाचार व शिस्त राखली पाहिजे. टेबल, खुर्च्या नीट लावलेल्या असाव्यात व स्वयंपाकगृहातील फरशी, वॉश बेसीन्स, स्वयंपाकाची भांडी, कपबश्या, पाणी पिण्याचे ग्लास इत्यादी रोजचे रोज धुवून स्वच्छ ठेवले पाहिजेत. साफसफाईसाठी लागणारे साहित्य, उदा. फिनाईल, डिटर्जन्ट पावडर इत्यादी ठेकेदाराने स्वत: आणले

HBPCL

पाहिजे. ठेकेदाराने उपहागृहात प्रत्येक टेबलवर पाणी पिण्याचे ग्लास एका डीशमध्ये उपडी ठेवावे. तसेच पाण्याचे झाकण बंद जार ठेवावे. तसेच जेवणाचे टेबल स्वच्छ असावेत.

१४. उपहागृह कंत्राटदाराने उपहारगृहाबाहेर जेवणाचे ताट, चमचा, वाटी, पाण्याचा ग्लास, प्लेट ठेवण्याकरिता स्वतंत्र मोठया आकाराचे भांडे ठेवावे; जेणेकरून जेवून झाल्यावर प्रत्येक कर्मचारी स्वतःचे ताट स्वतः उपहारगृहाबाहेर ठेवलेल्या मोठया आकाराच्या भांडयामध्ये ठेवेल. उपहारगृहामध्ये कावळे, मांजर, पाली, झुरळ, गांडूळ, उंदीर, माशी व इतर कुठल्याही प्रकारचे किटक येणार नाही याची जबाबदारी कंत्राटदारावर असेल. सदर नियमाचे उल्लंघन झाल्यास ठेकेदारास प्रति दिन कमाल रू. ५,०००/— दंड आकारला जाईल

१५. अन्नपदार्थ तयार करणे, ते साठवणे व वाढणे या प्रत्येक बाबीवर ठेकेदाराने योग्य देखरेख केली पाहिजे व त्याकरीता आवश्यक त्याबाबी त्याने स्वखर्चाने आणणे आवश्यक आहे. खाद्यपदार्थ उघडे राहणार नाहीत व त्यावर माशा, किटक इत्यादी बसणार नाहीत ह्याची ठेकेदाराने खबरदारी घेतली पाहिजे, तसेच उपहारगृहात पुरेशा प्रमाणात खाद्यपदार्थ उपलब्ध नसतात अशी कर्मचाऱ्यांकडून तक्रार येता कामा नये.

१६. कोणत्याही परिस्थितीत आदले दिवशी उरलेले (शिळे) खाद्य पदार्थ दुसऱ्या दिवशी उपयोग न करणेसंबंधी ठेकेदाराने पूर्ण काळजी घेतली पाहिजे. निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ पुरविल्याची तक्रार आल्यास व तसे सिध्द झाल्यास ठेकेदारास प्रति दिन कमाल रू. ५,०००/— दंड आकारला जाईल. या बाबतीत हाफकिन उपहारगृह समितीचा निर्णय अंतिम राहील.

१७. ठेकेदाराने नेमलेल्या नोकरवर्गास दरमहा ०७ तारखेच्या आत मागील महिन्याचा पगार देणे ठेकेदारावर बांधील असेल तसेच The Minimum Wages Act,1948 अनुसार ठरविण्यात येणारा मासिक पगार हा Minimum Wages पेक्षा कमी रक्कमेचा असता कामा नये. सदर बाबीचे पालन झाल्यानंतरच ठेकेदाराचे मासिक देयक पारीत करण्यात येईल.

१८. उपहारगृहामध्ये पुरविले जाणारे साहित्य उदा.— जेमिनी सनफ्लॉवर तेल, तांदूळ, पीठ, भाज्या, मसाले इत्यादी यांचा दर्जा हाफकिन उपहारगृह समितीच्या निर्देशानुसारच ठरविण्यात येतील.

- तेल हे फक्त जेमिनी किंवा फॉरच्युन किंवा प्रिया कंपनीचे असावे.
- मीठ हे फक्त टाटा कंपनीचे असावे.
- मसाले हे फक्त एव्हरेस्ट किंवा सुहाणा कंपनीचे असावे.
- लोणचे हे फक्त बेडेकर किंवा कुबल कंपनीचे असावे.
- बटर हे फक्त अमूल किंवा गोवर्धन किंवा मदरडेअरी कंपनीचे असावे.
- दूध हे फक्त गोकूळ किंवा महानंदा किंवा अमूल किंवा मदरडेअरी किंवा नंदीनी कंपनीचे असावे.
- डालडा हा फक्त गोदरेज कंपनीचा असावा.
- पापड हे फक्त लिज्जत किंवा गणेश कंपनीचे असावे.

१९. ठेकेदाराने नियुक्त केलेल्या नोकरवर्गास अन्नपदार्थ बनविणे व सेवा देणेकरीता हातमोजे, ॲप्रॉन, डोक्यावरील टोपी ( Head cap) व इतर स्वच्छता आणि सुरक्षेसंदर्भात उपयुक्त असलेल्या बाबी आणि ओळखपत्र पुरविणे आवश्यक आहे.

२०. एखादया दिवशी सोबत जोडलेल्या खादयपदार्थ तपशिलामधील नमूद पदार्थ कोणत्याही कारणास्तव उपहारगृह कंत्राटदार तयार करू न शकल्यास उपहारगृह समिती सदस्यांशी पूर्वचर्चा करून उपहारगृह कंत्राटदार दुसरा खादयपदार्थ तयार करू शकतो. उपहारगृह समिती सदस्यांशी चर्चा न करता स्वतःच्या इच्छेनुसार अथवा उपहारगृह समिती व्यतीरिक्त इतर व्यक्तीशी चर्चा करून नमूद मेनुमधील एखादा खादयपदार्थ न बनविता दुसरा खादयपदार्थ तयार केल्यास उपहारगृह कंत्राटदाराला कमाल रूपये ५००/— प्रतिदिन दंड अकारण्यात येईल. व सदर दंडाची रक्कम त्याच्या मासिक अनुदानातून वळती करण्यात येईल.

HBPCL

२१. उपहारगृहामध्ये अनुदानीत आणि विनाअनुदानीत असे दोन्ही दर असलेली खाद्यपदार्थांची दरसुची सुचना फलकावर लावण्याची जबाबदारी हि उपहारगृह कंत्राटदारावर असेल व त्यानुसार हाफकिन महामंडळातील कर्मचाऱ्यास अनुदानीत आणि महामंडळाव्यतिरिक्त कर्मचाऱ्यास विनाअनुदानीत दरात उपहारगृह सुविधा देण्याची संपूर्ण जबाबदारी हि उपहारगृह कंत्राटदाराची असेल.

२२. हाफकिन महामंडळाने ठरविलेल्या व अनुदानप्राप्त असलेल्या मेनूव्यतिरिक्त इतर प्रकारचे खाद्यपदार्थ व मद्यरहित/अल्कोहोलरहीत इतर पेये कार्यालयीन वेळेत ठेकेदार उपहारगृह समितीच्या परवानगीने ठरविण्यात येणाऱ्या दराने पुरवू शकतो.

२३. ठेकेदारास उपहारगृह चालविण्याचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. व त्यासाठीचा योग्य तो पुरावा सादर केला पाहिजे.

२४. हाफकिन जीव—औषध निर्माण महामंडळाकडून फक्त पाणी, विज, आणि सामान ठेवण्याकरिता स्टोअर रूम या बाबी ठेकेदारास पुरविण्यात येतील; कोणत्याही परिस्थितीत या वस्तूंचा गैरवापर केला जाता कामा नये. हाफकिन उपहारगृहाकरीता लागणाऱ्या सर्व प्रकारच्या भांडी, ग्राईडर, मिक्सर, ज्युसर, इंडस्ट्रीयल सिलेंडर, इत्यादी सर्व प्रकारच्या वस्तू ठेकेदाराने स्वमालकीच्या उपलब्ध कराव्यात. व त्या सांभाळण्याची जबाबदारी पूर्णत: ठेकेदाराची/कंत्राटदाराची असेल. सदर भांडी/वस्तू गहाळ झाल्यास त्याची भरपाई हाफकिन महामंडळाकडून करण्यात येणार नाही.

**२५. उपहारगृहाची आणि उपहारगृहामध्ये कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण सुरक्षेची जबाबदारी ही उपहारगृहकंत्राटदाराची असेल. शासनाचे अग्नीसुरक्षेविषयी असलेल्या नियमांचे उपहारगृह कंत्राटदार काटेकोरपणे पालन करेल.**

२६. महामंडळाची उपहारगृह समिती वेळोवेळी उपहारगृहास भेट देईल. त्यास ठेकेदाराने आडकाठी करता कामा नये. त्या समितीने दिलेल्या सूचनांचे योग्य पालन ठेकेदाराने केले पाहिजे.

२७. करारपत्रातील सेवाशर्ती व अटींचा भंग झाल्यास करार तात्काळ संपुष्टात आणण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन जीव—औषध निर्माण महामंडळ यांना राहील.

२८. उपहारगृह हे व्यवस्थापनाने नेमून दिलेल्या वेळेतच उघडे राहील व उपहारगृह उघडे ठेवण्याच्या वेळा महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या जेवणाच्या वेळेनुसार ठरविण्यात येतील. नेमून दिलेल्या वेळेशिवाय अन्य वेळी उपहारगृह उघडे ठेवल्यास त्याबद्दल योग्य वाटेल अशी आर्थिक दंडात्मक कारवाई करण्यात येईल व अशा दंडाची रक्कम ठेकेदारास द्यावयाच्या मासिक अर्थसहाय्यातून वळती करण्यात येईल. व त्यास ठेकेदाराची मान्यता राहील.

३०. ठेकेदारीसाठी आलेल्या निविदांपैकी एखादी निविदा अथवा सर्व निविदा काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालकांस राहील.

३१. निवड केलेल्या ठेकेदारास उपहारगृह चालविण्याबाबतच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करावा लागेल.

३२. कराराची मुदत एका वर्षाची असेल. या करार कालावधीत ठेकेदाराची सेवा समाधानकारक असल्यास व मा. व्यवस्थापकीय संचालकांना योग्य वाटल्यास त्याच दराने व त्याच अटी व शर्तीसह उभयपक्षी मान्य असल्यास कराराची मुदत व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने पुढील दोन वर्ष (एकूण तीन) वर्षापर्यंत वाढविता येईल.

३३. नमूद करारातील कोणत्याही बाबीचा उपहारगृह कंत्राटदाराकडून भंग झाल्यास अथवा कोणतेही कारण न दर्शविता कराराच्या मुदती अगोदर करार रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालकांकडे राहील. या संबधीत व्यवस्थापकीय संचालकांच्या निर्णयाविरूध्द कोणत्याही लवादापुढे न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३४. ठेकेदाराला आपला करार संपुष्टात आणावयाचा असल्यास त्याने व्यवस्थापकीय संचालक यांना दोन महिने अगोदर लेखी सूचना दिली पाहिजे. कंत्राट कालावधी पूर्ण होण्याअगोदर कुठल्याही कारणास्तव कंत्राटदार आपले कंत्राट सोडून जात असल्यास कंत्राटदाराने महामंडळाकडे जमा केलेल्या

HBPCL

अनामत रकमेमधून अथवा मासिक अनुदानामधून रूपये २५,०००/— एवढी रक्कम दंड म्हणून महामंडळाकडून वळती करण्यात येईल. व उर्वरीत रक्कम कंत्राटदारास धनादेशाद्वारे देण्यात येईल.

३५. निवड केलेल्या निविदाधारकास ठेकेदार म्हणून नेमण्याच्या वेळी त्यास रोख रू. २,००,०००/— (रू. दोन लाख फक्त) इतकी बिनव्याजी रक्कम अनामत ठेव म्हणून महामंडळाकडे ठेवावी लागेल. अनामत ठेवीची रक्कम, कराराची मुदत किंवा वाढविलेली मुदत संपल्यानंतर त्वरीत परत केली जाईल.

३६. निविदा भरणाऱ्या उपहारगृह कंत्राटदाराने यापूर्वी हाफकिन महामंडळास सेवा पूरवली असल्यास, अशा निविदा भरणाऱ्या उपहारगृह कंत्राटदाराचा पूर्वइतिहास तपासून तसेच त्या कंत्राटदाराने उपहारगृहाच्या निविदेतील अटी व शर्तींचा भंग केला होता असे आढळल्यास किंवा अटींचे पालन केले नसल्यास अशा कंत्राटदारांच्या निवीदा रद्द करण्याचा अधिकार हाफकिन महामंडळास राहील.

३७. खालील नमूद सूची १ आणि सूची २ मधील पदार्थामध्ये काही कारणास्तव बदल करण्याचे अधिकार हाफकिन महामंडळाच्या उपहारगृह समितीस असतील.

३८. निविदा भरताना सर्व प्रकारचे जीएसटी, वॅट, सेल्स टॅक्स सह अंतिम दर नमूद करावे.

३९. या निविदा संचातील कोणतेही कागद काढून घेऊ नये किंवा बदलू नये.

४०. उपहारगृह कंत्राटदारास फक्त कर्मचारी यांचेसाठीच चहा, नाश्ता, जेवण बनवण्याची परवानगी असेल. इतरांसाठी सदर सुविधा देण्यास सक्त मनाई असेल व तसे आढळल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल.

४१. निविदा भरणाऱ्या व्यक्तिने खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रती जोडाव्यात अन्यथा निविदा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१) दुकाने आणि संस्था अधिनियम, १९४८ नोंदणी प्रमाणपत्र
२) पॅन कार्ड व आधारकार्ड
३) कॅटरींग फर्म रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
४) FSSAI चे लायसन्स
५) राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असल्याचा पुरावा अथवा बॅक स्टेटमेंट.
६) इतर मान्यवर औद्योगिक आस्थापनामध्ये उपहारगृह अथवा हॉटेल चालविण्याचा अनुभव दर्शविणारे प्रमाणपत्र
७) ई.एस.आय.सी. व प्रोव्हींडंट फंड आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची वर्गणी भरत असल्याबाबत मागील १ वर्षाचा पुरावा अथवा लागू नसल्यास उपहारगृह कंत्राटदाराने लेटरहेडवरील लेखी पत्र जोडावे
८) मागील तीन वर्षांची वार्षिक उलाढालीची माहिती देण्यात यावी.

---

HBPCL

# उपहारगृहातील साप्ताहिक दुपारी जेवणाच्या खादय पदार्थांचा तपशिल
# (सूची १)

| अ.क्र. | वार | दुपारच्या जेवणाचे खादय पदार्थ |
|---|---|---|
| १ | सोमवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे |
| २ | मंगळवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे |
| ३ | बुधवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे<br><br>**मांसाहारी जेवण** :— २ मोठेपिस चिकन मसाला, पातळ भाजी, २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी |
| ४ | गुरूवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे |
| ५ | शुक्रवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे<br><br>**मांसाहारी जेवण** :— २ मोठेपिस चिकन मसाला पातळ भाजी, २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी |

टिप :—

१) उपहारगृह समितीने प्रमाणीत केलेला वाटीचा आकार, डीश, जेवणाची थाळी, यानुसार वरील सुचीमध्ये नमूद केलेले अन्नपदार्थ त्या प्रमाणात पुरविण्यात यावेत.

२) चपाती मोठया आकाराची व चांगल्या प्रतिच्या गव्हाची व व्यवस्थीत भाजलेली असावी. जास्त जळालेली नसावी

३) आवश्यकतेनुसार शनिवारी व रविवारी जेवण सुविधा देण्यात येईल.

४) कॉफी, लस्सी, लिंबू सरबत, कोकम सरबत, फ्रुट ज्यूस, शितपेये, इत्यादी पेय बाजारभाव मूल्यापेक्षा कमी दरामध्ये पुरविण्यात यावीत.

६) पदार्थ तयार करण्याकरीता वापरावयाचे तेल हे कोलेस्टेरॉल फ्री आणि ह्रदयासाठी अपायकारक नसावे.

७) **भाजीचे प्रकार** :—मटकी भाजी, मोड आलेले मूग, चणे, काबुली चणे छोले, काळा वाटाणा, कारले—बटाटा, कोबी चणाडाळ, दुधी चणाडाळ, फ्लावर बटाटा, कोबी, वाटाणा बटाटा, झुणका पिठल, फरसबी, चवळी, सिमला मिरची, तोंडली, पडवळ, पालेभाजी, मेथीभाजी, गवार, हिरवा वाटाणा, सफेद वाटाणा, वांगी—बटाटा, सुरण, शेव टॉमेटो भाजी, डाळींबी, वाल उसळ, भेंडी ईत्यादी.

८) **भाताचे प्रकार** :— सफेदभात, जीरा राईस, फ्राईड राईस, मसालेभात, बिरयाणी, लेमन राईस, दालखिचडी, ईत्यादी.

९) दररोज नुसत्या कडधान्याच्या भाज्या असता कामा नये. महिन्यातुन जास्तीत जास्त एका प्रकारची भाजी दोन पेक्षा जास्त वेळा करू नये.

९) **डाळीचे प्रकार** :— डाळ, दालतडका, आमटी, कढी, वरण, पीठले, ईत्यादी.

१०) **शाकाहारी थाळीच्या दरामध्ये फळाहार (फ्रूट सलॅड) दयावे.** दररोज दुपारी उपाहारगृहात जेवण किंवा फळाहार (फ्रूट सलॅड) हा अनुदानित दराने उपलब्ध असेल. ज्या कर्मचारी यांना दुपारी जेवण आणि फळाहार असे दोन्ही पदार्थ पाहीजे असल्यास फळाहार हा बाजारभाव मूल्याने उपलब्ध असेल. फळाहार (फ्रूट सलॅड) मध्ये विविध ४ ते ५ प्रकारच्या ताज्या फळांचा समावेश असावा.

HBPCL

## उपहारगृहामध्ये उपहारगृह कंत्राटदाराकडून कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या नाश्त्याचा तपशिल (सूची २)

| अ. क्र. | वार | सकाळचा नाश्ता सकाळी ८.०० ते १०.०० | सायंकाळचा नाश्ता सायं. ४.०० ते ७.०० |
|---|---|---|---|
| १ | सोमवार | इडली सांबार, चटणी आणि समोसा पाव चटणी | कटलेट, सॉस |
| २ | मंगळवार | उपमा आणि मिसळ पाव | सॅण्डवीच (साधा) चटणी व सॉस |
| ३ | बुधवार | उत्तप्पा (ओनियन, टॉमेटो) चटणी, सांबार आणि अंडा बुर्जी पाव किंवा ऑम्लेटपाव | मसाला डोसा सांबार, चटणी |
| ४ | गुरूवार | मेदू वडा सांबार, चटणी आणि कांदा पोहे | भजी (मुग/बटाटा/कांदा/कोबी/पालक/मेथी मिक्स पकोडा) |
| ५ | शुक्रवार | वडापाव उसळ चटणी आणि गोड अननस शीरा | ढोकळा |
| ६ | शनिवार मागणीप्रमाणे | उसळ पाव | भजी |

- दररोज सकाळी ८.०० ते १०.०० या वेळेत जास्तीत जास्त १ कप चहा व २ प्लेट नाश्ता प्रतिकर्मचारी
- सकाळी ११.०० वाजता फक्त १ कप चहा प्रतिकर्मचारी
- दुपारी ३:०० वाजता फक्त १ कप चहा प्रतिकर्मचारी
- सायंकाळी ४ वाजताफक्त १प्लेट नाश्ता प्रतिकर्मचारी
- दुसऱ्या पाळीतील कर्मचाऱ्यांना सायंकाळी ६ वाजता जास्तीत जास्त १ कप चहा व २ प्लेट नाश्ता प्रतिकर्मचारी
- शनिवारी व रविवारी मागणीनुसार नाश्ता देण्यात येईल.
- एकाच प्रकारचा स्पेशल चहा असेल.
- इडली, मेदू वडा, उत्तप्पा सोबत देण्यात येणारी चटणी हि खोबऱ्याची असेल. कोणत्याही प्रकारच्या डाळीची चटणी करू नये.
- मधुमेह असलेल्या कर्मचाऱ्यांकरिता साखर नसलेला चहा देण्यात यावा.
- मागणीनुसार ग्रीन टी, आणि ब्लॅक टी बाजारभाव मुल्याप्रमाणे देण्यात यावी.

**टीप :—खादय पदार्थ बनविण्याकरीता वापरण्यात येणारे साहित्य खालीलप्रमाणे असावे**

१) कांदा पोहे :—एककिलो पोहे बनविण्याकरीता २०० ग्रॅम शेंगदाणे, अर्धाकिलो कांदा, अर्धाकिलो बटाटा, कोथींबीर, शेव, ओले खोबरे.

२) उपमा :— मटार, कांदा, गाजर, टॉमेटो, फरस बी, कोथींबीर, ओले खोबरे.

३) उत्तप्पा :— ओनियन, टॉमेटो, नारळ चटणी, सांबार

४) ढोकळा :— मिक्स डाळींचा (तांदूळ + मूग डाळ + चणा डाळ + उडीद डाळ

५) समोसा :— पंजाबी समोसा आणि पट्टी समोसा या प्रकारचा तसेच त्यामध्ये वाटाणा, बटाटा, कोथींबीर, कडीपत्ता, हळद, आले लसूण मिरची पेस्ट असणे आवश्यक

६) सॅण्डविच :— २ स्लाईस ब्रेड, १ स्लाईस बीट, १स्लाईस कांदा, ४—५ स्लाईस काकडी, ३ स्लाईस टॉमेटो, १ स्लाईस बटाटा, हिरवी चटणी, अमूल बटर

७) मिसळ :— कमीत कमी ४ ते पाच मोड आलेली कडधान्ये, (चणे, पांढरे वाटाणे, हिरवे मूग, मटकी, राजमा इत्यादी) कांदा, कोथींबीर, लिंबू, फरसाण.

८) बटाटा वडा :— बटाटा + आले, लसूण पेस्ट + हळद + मिरची + कोथींबीर

HBPCL

## उपहारगृहामध्ये उपहारगृह कंत्राटदाराकडून कर्मचा—यांना पुरविण्यात येणा—या नाश्त्याचे प्रमाण

| अ.क्र. | नाश्ता (एका प्लेटचे प्रमाण) |
|---|---|
| १ | कांदा पोहे +लिंबू + शेव (किमान १५० ग्रॅम) |
| २ | २ नग इडली सांबार, चटणी (एकूण वजन १५० ग्रॅम) |
| ३ | २ नग बटाटावडा + उसळ + २ पाव (एकूण वजन १५० ग्रॅम) |
| ४ | २ नग मेदू वडा + सांबार, चटणी (एकूण वजन १५० ग्रॅम) |
| ५ | मिसळ + २पाव + चटणी + कांदा+ लिंबू+ फरसाण (एकूण वजन २०० ग्रॅम) |
| ६ | भजी (मुग/बटाटा/कांदा/कोबी/पालक/मेथी मिक्स पकोडा) + २पाव +चटणी (एकूण वजन १००ग्रॅम) |
| ७ | २ नग समोसा + २पाव + चटणी (एकूण वजन १५० ग्रॅम) |
| ८ | २ नग उतप्पा(कांदा व टोमॅटो) + सांबार + चटणी (एकूण वजन ३००ग्रॅम) |
| ९ | २ नग ढोकळा + चटणी + १ तळलेली मिर्ची (एकूण वजन १५० ग्रॅम) |
| १० | २ नग सॅण्डवीच (साधा) (कांदा, बटाटा, काकडी, टोमॅटो, बीट, गाजर) चटणी व सॉस |
| ११ | उपमा + लिंबू + शेव (किमान १५० ग्रॅम) |
| १२ | अननस शीरा (किमान १५० ग्रॅम) |

HBPCL

## हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्यादित)

आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई — ४०० ०१२

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

## <u>कॅन्टीन चालवणेसाठी निविदा</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निविदा भरणाऱ्याचे नाव | : | |
| २. | उपगृहाचे नाव व रजिस्टर पत्ता<br>दूरध्वनी क्रमांक (असल्यास) | : | |
| ३. | निविदा भरणाऱ्या व्यक्तीचा<br>सध्याचा व्यवसाय | : | |
| ४. | औद्योगिक उपहारगृह चालविण्याचा एकूण<br>किती वर्षे अनुभव आहे.<br>(सोबत प्रमाणपत्रे जोडावीत). | : | |
| ५. | निविदा भरणाऱ्या व्यक्तिचा बॅक खाते<br>क्रमांक, बॅकेचे नाव व पत्ता | : | |
| | पॅन कार्ड क्र. | : | |
| | आधार कार्ड क्र. | : | |
| | जी.एस.टी. क्र. | : | |
| ६) | आपणास ओळखत असणाऱ्या दोन<br>जबाबदार व्यक्तींची नावे,पत्ते व व्यवसाय | : | १) ———————————————<br>२) ——————————————— |
| ७) | निविदा भरणारा निविदाधारक हा<br>भारतीय आहे का ? | : | होय / नाही |

दिनांक :—

निविदा भरणाऱ्याची सही व शिक्का

<u>(वरील सर्व माहीती नमूद व सही करून सदर पान निविदेसोबत ऑनलाईन जोडावे )</u>

HBPCL

# उपहारगृहातील साप्ताहिक जेवणाच्या खादय पदार्थांचा तपशिल

| अ.क्र. | वार | दुपारच्या जेवणाचे खादय पदार्थ |
|---|---|---|
| १ | सोमवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणच |
| २ | मंगळवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे |
| ३ | बुधवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे<br><br>**मांसाहारी जेवण** :— २ मोठेपिस चिकन मसाला पातळ भाजी, २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी |
| ४ | गुरूवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे |
| ५ | शुक्रवार | २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, १ वाटी भाजी, चपाती ३नग, पापड, १ दहीवाटी, लोणचे<br><br>**मांसाहारी जेवण** :— २ मोठेपिस चिकन मसाला पातळ भाजी, २ वाटी भात, १ वाटी डाळ किंवा आमटी, चपाती ३ नग, पापड, १ दहीवाटी |

मांसाहारी जेवणाच्या एका थाळीचा दर रूपये =
(जीएसटी दर वेगळा नमुद करावा)

शाकाहारी जेवणाच्या एका थाळीचा दर रूपये =

(जीएसटी दर वेगळा नमुद करावा)

दिनांक :— निविदा भरणाऱ्याची सही व शिक्का

(वरील दरपत्रक माहीती इ—निविदेसोबत असलेल्या **BOQ** मध्ये ऑनलाईन भरावी.

HBPCL

## उपहारगृहामध्ये उपहारगृह कंत्राटदाराकडून कर्मचा—यांना पुरविण्यात येणा—या नास्त्याचा तपशिल

| अ. क्र. | वार | सकाळचा नाश्ता सकाळी ८.०० ते १०.०० | सायंकाळचा नाश्ता सायं. ४.०० ते ७.०० |
|---|---|---|---|
| १ | सोमवार | इडली सांबार, चटणी आणि समोसा पाव चटणी | कटलेट, सॉस |
| २ | मंगळवार | उपमा आणि मिसळ पाव | सॅण्डवीच (साधा) चटणी व सॉस |
| ३ | बुधवार | उत्तप्पा (ओनियन, टॉमेटो) चटणी, सांबार आणि अंडा बुर्जी पाव किंवा ऑम्लेटपाव | मसाला डोसा सांबार, चटणी |
| ४ | गुरूवार | मेदू वडा सांबार, चटणी आणि कांदा पोहे | भजी (मुग/बटाटा/कांदा/कोबी/पालक/मेथी मिक्स पकोडा) |
| ५ | शुक्रवार | वडापाव उसळ चटणी आणि गोड अननस शीरा | ढोकळा |
| ६ | शनिवार मागणीप्रमाणे | उसळ पाव | भजी |

सरासरी १ प्लेट नाश्ताचा दर रूपये =

(जीएसटी दर वेगळा नमुद करावा)

एक कप चहाचा दर रूपये =

(जीएसटी दर वेगळा नमुद करावा)

शनिवारी व रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी मागणीनुसार असलेला नाश्त्याचा दर वरील नमूद दराप्रमाणेच असेल.

दिनांक :— निविदा भरणाऱ्याची सही व शिक्का

(वरील दरपत्रक माहीती इ—निविदेसोबत असलेल्या **BOQ** मध्ये ऑनलाईन भरावी.

HBPCL